महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः संकीर्ण-२०१७/प्र.क्र.७६/१४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ०३ एप्रिल, २०१८

संदर्भ - १) सामान्य प्रशासन विभाग, आ.क्र.कअनि-१११५/प्र.क्र.७२/का.१४ब, दि.३०.०५.२०१५
२) सामान्य प्रशासन विभाग, शा.आ.क्र.असप-१२१५/प्र.क्र.१२५/१४, दि.०३.०३.२०१६
३) सामान्य प्रशासन विभाग, शा.आ.क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.७६/१४, दि.०१.०६.२०१७

आदेश

श्री.अ.ज.खंदारे, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांची संदर्भाधीन क्र.१ च्या शासन आदेशान्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील, सहायक संचालक, पुरातत्व विभाग, औरंगाबाद या पदावर १ वर्षाच्या कालावधीकरिता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर श्री.खंदारे यांची संदर्भाधिन क्र.२ च्या आदेशान्वये अवर सचिव पदावर पदोन्नती होऊन, त्यांना सदरहू प्रतिनियुक्तीच्या पदावर ६ महिन्यांच्या कालावधीसाठी तदर्थ स्वरुपात प्रपत्र बढती देण्यात आली. संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये त्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदत दि.०३.०३.२०१८ रोजी संपुष्टात आली आहे.

२. आता या आदेशान्वये श्री.अ.ज.खंदारे, अवर सचिव यांच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील, सहायक संचालक, पुरातत्व विभाग, औरंगाबाद या पदावर दि.०४.०३.२०१८ पासून पुढे १ वर्ष म्हणजेच दि.०३.०३.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर कालावधी संपल्यानंतर श्री.खंदारे, अवर सचिव यांना मंत्रालयातील अवर सचिव पदावर रुजू होणे आवश्यक आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४०३१५०८४१०३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a7272 5a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d 6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.04.03 15:10:49 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) अ.मु.स.(सेवा), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई-३२
४) अ.मु.स./प्र.स./सचिव, सामान्य प्रशासन विभाग / पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) सह/उप सचिव (आस्थापना) सामान्य प्रशासन विभाग / पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालयानल, मुंबई,
७) श्री.अ.ज.खंदारे, अवर सचिव तथा सहायक संचालक, पुरातत्व विभाग, औरंगाबाद
८) का.१४/संग्रहार्थ